# आकाशवाणी पुणे

# प्रादेशिक वृत्त विभाग

# पुणे वृत्तांत

# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 08.11.2024** **वार – शुक्रवार**

---

पुण्यात विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला खऱ्या अर्थानं सुरुवात झाली आहे. भारतीय जनता पक्ष, काँग्रेस, शिवसेना, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे, राष्ट्रवादी कॉंग्रेस आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष या प्रमुख सहा पक्षांबरोबरच महाराष्ट्र नवनिर्माण सेना, वंचित बहुजन आघाडी ,बहुजन समाजवादी पक्ष आदी पक्षही निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत. आणि सर्वच पक्षांचे उमेदवार बाईक रैली, प्रचार फेरी, पदयात्र अशा प्रत्यक्ष प्रचारावर भर देताना दिसत आहेत.

**रावत**

"घराघरापर्यंत असलेला संपर्क ही भाजपची खरी ताकद आहे. समर्पित कार्यकर्ता ही पक्षाची ओळख आहे. म्हणूनच प्रत्येक कार्यकर्त्यानं मतदानाच्या दिवसापर्यंत झोकून देऊन काम करावं," असं आवाहन माजी खासदार प्रदीप रावत यांनी केलं. पुण्यातील शिवाजीनगर मतदारसंघातील भाजपचे आजी-माजी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांचा सहकुटुंब मेळावा आज आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. शिवाजीनगरचे आमदार सिद्धार्थ शिरोळे, प्रचारप्रमुख दत्ता खाडे, अपर्णा कुऱ्हाडे यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**राजस्थानी समाज**

पुणे शहर राजस्थानी समाजानं भारतीय जनता पक्षाला आपला पाठिंबा दिला आहे. दिवाळीनिमित्त समस्त राजस्थानी समाज पुणे शहराच्या वतीनं बाणेरमध्ये सस्नेह संमेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं. या कार्यक्रमात संघटनेच्या वतीनं एकमतानं भाजपा आणि कोथरुड विधानसभेचे महायुतीचे उमेदवार चंद्रकांत पाटील यांना पाठिंबा जाहीर केला.

**मिसाळ**

गुलटेकडी परिसरातील मीनाताई ठाकरे वसाहत, इंदिरानगरमधील महापालिकेच्या जागेवरील झोपडपट्टीचं एसआरए अंतर्गत त्याच जागेवर पुनर्वसन करण्यात येणार असल्याची माहिती

महायुतीच्या पर्वती मतदारसंघाच्या उमेदवार आमदार माधुरी मिसाळ यांनी दिली. मीनाताई ठाकरे वसाहत, मुकुंदनगर, महर्षीनगर, प्रेमनगर परिसरात मिसाळ यांच्या प्रचारार्थ आज  पदयात्रेचं आयोजन करण्यात आलं होतं. त्यावेळी त्या बोलत होत्या.

**पथके**

पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघात 85 वर्षावरील 91 जेष्ठ नागरिक आणि  सहा दिव्यांग अशा एकूण 97 मतदारांच्या गृह मतदानासाठी आठ पथकांची नियुक्ती करण्यात आली असून 14 ते 16 नोव्हेंबर या तीन दिवसात गृह मतदानाची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सिद्धार्थ भंडारे यांनी कळविली आहे. गृहमतदान पथकामध्ये एक मतदान अधिकारी, एक इतर अधिकारी, पोलीस कर्मचारी, शिपाई,व्हिडिओ ग्राफर व सूक्ष्म निरीक्षक यांचा समावेश राहील. ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी नियुक्त अधिकारी- कर्मचाऱ्यांना  कॅम्प, पुणे इथल्या सभागृहात 13 तारखेला सकाळी 11 ते 12.30 या वेळेत प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

**जनजागृती**

सार्वत्रिक विधानसभा निवडणूक 2024 च्या अनुषंगानं  पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दीत येणाऱ्या पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदारसंघात मतदानाचं प्रमाण वाढविण्यासाठी महापालिकेच्या मुख्य पप्रशासकीय इमारतीच्या प्रांगणात तसंच रुपीनगर तळवडे इथं  मतदार जनजागृती अभियान राबविण्यात आलं. यावेळी उपस्थित तृतीयपंथी कर्मचाऱ्यांनी येत्या निवडणुकीत मतदान करणार असल्याचं सांगितलं.

**लष्करी सराव**

"दहशतवाद, मूलतत्त्ववाद, सायबर सुरक्षा या सारख्या समस्या जगभर वाढत आहेत. हिंद प्रशांत महासागर प्रदेशात स्थिरता, शांतता प्रस्थापित करून प्रगती करण्याच्या दृष्टीने 'ऑस्ट्राहिंद'  हा लष्करी सराव महत्त्वपूर्ण ठरणार आहे," असं प्रतिपादन ऑस्ट्रेलिया लष्कराच्या ब्रिगेडियर अमांडा विल्यमसन यांनी आज पुण्यात केलं. भारत ऑस्ट्रेलिया दरम्यान तिसऱ्या ऑस्ट्राहिंद 2024 या लष्करी संयुक्त सरावाला आज पुण्यात औंध लष्करी तळावर सुरुवात झाली. 21 नोव्हेंबरपर्यंत चालणाऱ्या या संयुक्त सरावात भारत आणि ऑस्ट्रेलिया लष्करातील लाईट हॉर्स रेजिमेंट आणि भारतीय लष्कराच्या डोग्रा रेजिमेंटचे 120 जवान सहभागी झाले आहेत. दोन आठवड्याच्या या संयुक्त सरावात तंत्रज्ञानाची देवाणघेवाण, समरिक कौशल्याचं आदानप्रदान, युद्ध कवायती तसच दोन्ही लष्करात क्रिकेट सामना पण होणार आहे.

**नव्या गाड्या**
एसटीच्या पुणे विभागाच्या ताफ्यात आगामी दोन महिन्यांच्या काळात 150 नव्या स्वमालकीच्या बसगाड्या दाखल होणार आहेत. या गाड्यांमुळे प्रवाशांना अधिक सुविधा मिळणार आहेत. एसटीच्या पुणे विभागात 14 आगार आहेत. त्या आगारांना त्यांच्या मागणीनुसार नव्या बसगाड्यांचं वाटप होण्याची शक्यता आहे. यात इंदापूर, तळेगाव, राजगुरुनगर, पिंपरी-चिंचवड, मंचर, शिवाजीनगर (वाकडेवाडी), शिरूर, भोर, दौंड, स्वारगेट, नारायणगाव, बारामती आणि बारामती एमआयडीसी, सासवड या आगारांचा समावेश आहे. यापूर्वी नवीन इलेक्ट्रिकवरील शिवाई आणि शिवनेरी अशा एकूण 150 बस पुणे विभागाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत, अशी माहिती एसटीचे पुणे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली .

**हवामान**
पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 31 तर किमान तापमान 17 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या आकाश मुख्यत: निरभ्र राहण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**